# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २७/११/२०२५ (गुरूवार )**

---

## मा. पोलीस अधिक्षक आणि अपर पोलीस अधिक्षक यांच्या उपस्थितीत आगामी निवडणुक दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता नरखेड पोलीस स्टेशन अंतर्गत काढण्यात आला रूट मार्च आणि दंगा काबु योजनेचा घेतला सराव

आगामी नगर परिषद/नगर पंचायत निवडणुक २०२५ असल्याने नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत नमुद निवडणुक कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता दिनांक २७/११/२०२५ पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत रूट मार्च काढण्यात आला. सदर रूटमार्च पोलीस स्टेशन नरखेड येथुन सुरू करून नरखेड शहरात मुख्य रस्त्यांवरून महत्त्वाच्या चौकातुन घेण्यात आला.

सदर रूट मार्च मध्ये मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग, सहा. पोलीस निरीक्षक श्री अजित कदम, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन नरखेड यांच्यासह काटोल उपविभागातील अधिकारी अंमलदार, दंगा नियंत्रण पथक आणि जलद प्रतिसाद पथक ( **QRT** ) चे अंमलदार हजर होते. रूटमार्च नंतर गांधी चौक, नरखेड येथे जमाव व्यवस्थापनासाठी दंगा काबू योजनेबाबत सराव घेण्यात आला. दंगा काबू योजना सरावामध्ये ढाल, लाठी आणि अश्रुधुर यांचा वापर करून यशस्वीरित्या सराव पार पाडण्यात आला. त्यानंतर पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत मोवाड येथे सुध्दा रूटमार्च घेण्यात आला आहे.






LIC
मेडिकल स्टोर्स
भेल




## २४ तासात बकरी चोरीचे २ गुन्हे उघड, २ आरोपी अटक , केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद :—** पोलीस स्टेशन केळवद अंतर्गत दिनांक २४/११/२०२५ चे रात्री ०९:३० ते २५/११/२०२५ पहाटे ०३:०० वाजेच्या दरम्यान मौजा जोगा (माळेगाव) येथुन ६ बकऱ्या चोरी गेल्या बाबत गुन्हा नोंद आहे आणि दिनांक २४/११/२०२५ चे दुपारी ०१:३५ वाजेच्या सुमारास मौजा रामपुरी येथुन २ बोकड चोरी गेल्या बाबत माहीती वरून पोलीस स्टेशन केळवद येथे कलम ३०३(२) भारतीय न्याय संहीता अन्वये वरील प्रमाणे बकरी चोरीचे २ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

केळवद पोलीसांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास करीत गुप्तबातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या अधारे **अवघ्या २४ तसाच्या आत** दिनांक २७/११/२०२५ रोजी आरोपी नामे १) मोहम्मद इम्तीयाज कुरेशी, रा. शांतीनगर नागपुर आणि २) मयुर मारोती ओमकार,

रा. गौडखैंरी, चौदामैल, ता. कळमेश्वर ह.मु नागपुर यांना नागपुर शहरातुन ताब्यात घेवुन त्यांची चौकशी केली असता त्यांनी नमुद दोन्ही गुन्हे केल्याची कबुली दिली.

**पोलीसांनी आरोपीतांना अटक करून आरोपीतांच्या ताब्यातुन गुन्हयात चोरीस गेलेले २ बोकड किंमती १०,०००/— रूपये, रोख रक्कम ३०,०००/— रूपये, दोन ॲड्रॉईड मोबाईल किंमती १०,०००/— आणि गुन्हयात बकरी चोरी करण्यासाठी वापरलेले चारचाकी हुंडाई Eon वाहन एम.एच ०२ सी.पी २०५९ किंमती ३००,०००/— रूपये, असा एकुण किंमती ३,५०,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**



# केबल चोरीचा गुन्हा उघड, आरोपी अटक , स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बुटीबोरी :—** तक्रारदार नामे अवादा कंपनी तर्फे कंपनी सुपरवायजर किशोर गणपतराव मोहखाये वय ४० वर्षे रा. बुट्टीबोरी अंबिका बार चे मागे यांनी तक्रार दिली की, मौजा अवादा कंपनी परीसर बोरखेड, धवळपेठ येथे दिनांक ३०/०९/२०२५ ते १३/१०/२०२५ पर्यंत कंपनीतील आवारात ठेवलेला १४२७ मिटर केबल अंदाजे कि. ७०,०००/— रूपयांचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराटयांनी चोरी केल्याचे फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे कलम ३०३(२) भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

नमुद गुन्हयाचा तपास बुटीबोरी पोलीस करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांनी समांतर तपास सुरू केला. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्तबातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या अधारे दिनांक २६/११/२०२५ रोजी आरोपी नामे **१) प्रकाश भिखुजी मायकरकार,२) सुनील आकाश महाकाळकर, ३) नवसु गोपाळा महाजन, तिन्ही रा धवळपेठ, ४) संस्कार रामचंद्र बाहु, रा बिनाकी, मंगळवारी नागपुर, ५) चरणदास उत्तम काळे, रा बोरखेडी रेल्वे, ता. जि. नागपुर** यांना धवळपेठ परीसरातुन ताब्यात घेवुन त्यांची चौकशी केली असता त्यांनी नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली.

आरोपीतांना अटक करण्यात आली असुन दोन्ही आरोपी दिनांक २८/११/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मध्ये आहे. गुन्हयात चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त करण्याची प्रक्रीया सुरू आहे. पुढील तपास बुटीबोरी पोलीस करीत आहे.

# अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतां विरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये,गुन्हे नोंद

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक २६/११/२०२५ रोजी नरखेड पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी नामे क्रमांक १. राजेंद्र मारोती सावनेरे, रा. वार्ड ०३ बेलोना ता. नरखेड हा मौजा बेलोना ता. नरखेड, येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला, आरोपी क्रं २ नामे गंगाधर पुंडलिकराव नासरे,रा. वार्ड ०२ बेलोना ता. नरखेड

जि. नागपुर हा मौजा नरखेड येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. नमुद आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये २ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे,दारू बाळगुण विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १२ गुन्हे नोंद.

दिनांक २६/११/२०२५ दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू काढणारे तसेच दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, सडवा तसेच इतर साहीत्य असा **१,४५,८९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

पोलीस स्टेशन मौदा येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बोरी येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन नरखेड येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन जलालखेडा येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कोंढाळी येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन खापा येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कुही येथे २ गुन्हे नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण १२ नोंद केले आहे.

**सदर कारवाईत ५०४० मिली देशी दारू, १३८० लीटर मोहाफुल दारू, २०० लिटर सडवा तसेच इतर साहीत्य असा एकुण १,४५,८९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**